नियमित दिवाणी दावा क्र. ६९/२०१३

सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय.०९–००००३०८–२०१३

निशाणी क्र. १०३ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांनी दावा मिळकतीबाबत जैसे थे परिस्थीती ठेवण्याचा आदेश मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा हा वादी यांच्या उलटतपासाकरिता नेमला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ ने दावा 'क' मिळकती मधील अ.क्र.१ ची मिळकत पुर्णपणे जमिनदोस्त केली असून तेथे नवीन बांधकाम करण्याच्या तयारीत आहेत. दावा मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाही. यदा कदाचित प्रतिवादी क्र.१ ने विशीष्ट भागावर बांधकाम केल्यास दाव्याच्या अंतिम निकालावर परिणाम होणार आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी दावा 'क' मिळकतीमधील अ.क्र.१ च्या घर इमल्याचे कोणत्याही प्रकारे नवीन बांधकाम करु नये अथवा करवू नये याकरिता अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज निकाली होईपर्यंत जैसे थे परिस्थीती ठेवण्याबाबत आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत दावा आज रोजी सुनावणी करिता बोर्डावर नाही. वादी यांचा अर्ज नि.क्र.१०१ मंजूर करुन प्रस्तुत दावा आज रोजीच्या बोर्डावर घेण्यात आला आहे. वादी यांनी नि.क्र.१०२ येथे प्रतिवादी क्र.१ यांनी दावा ‘क’ मिळकतीमध्ये अ.क्र.१ या मिळकतीवर घर इमल्याचे कोणत्याही प्रकारे नवीन बांधकाम करु नये अथवा करवू नये असा प्रतिवादी क्र.१ विरुध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळणे करिता आज रोजी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज न्यायनिर्णीत करणे करिता विरोधी बाजूचे म्हणणे प्रस्तुत अर्जावर येणे आवश्यक वाटते. त्याकरिता अर्ज नि.क्र.१०२ येथे

विरोधी बाजूचे म्हणणे मागविण्यात आले आहे. वादी यांनी आपल्या अर्जा सोबत नि.क्र.१०५ अ.क्र.१ येथे चार छायाचित्रे दाखल केली आहेत. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, एक जुना इमला जमिनदोस्त करुन जागा सपाट केली आहे. तसेच काही चिऱ्यांचा ढिग करुन ठेवला आहे. वादी तर्फे वकील श्री. ए.ए.गोगटे यांनी असा युक्तीवाद केला की, जर प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकत ‘क’ अ.क्र.१ मधील मिळकती मध्ये बांधकाम पूर्ण केले तर दावा मिळकतीचे व दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे अर्ज नि.क्र.१०२ न्यायनिर्णीत होईपावेतो दावा मिळकती बाबत जैसे थे परिस्थीती ठेवण्याचा आदेश पारित करण्यात यावा. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुत दावा हा वाटपाकरिता दाखल केला असून सुनावणी करिता प्रलंबित आहे. वादी यांच्या कथना नुसार प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकत ‘क’ अ.क्र.१ मध्ये घर इमल्याचे बांधकाम करत आहे. प्रतिवादी याने सदर बांधकाम करु नये याकरिता प्रतिवादी क्र.१ विरोधात नि.क्र.१०२ येथे तुर्तातुर्त मनाई हुकूम आदेश मिळावा याकरिता अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, वादी तर्फे दाखल अर्ज व दाव्याची छायाचित्रे तसेच वादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद यांचा साकल्याने विचार केला असता पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## – आदेश –

प्रतिवादी क्र.१ यांनी अर्ज नि.क्र.१०२ वर म्हणणे दाखल करे पावेतो दावा मिळकत 'क' अ.क्र.१ मध्ये वादी व प्रतिवादी यांनी 'जैसे थे' परिस्थीती ठेवणेची आहे.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.11.05 15:23:53 +0530

( श्रीकांत एस.पचंडी )
दिनांकः ०५/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड